Pune Police

प्रेस नोट दिनांक ०४/०६/२०१८

## डॉक्टरला १० लाख रुपये खंडणी मागणारे आरोपी जेरबंद

भारती विद्यापीठ पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं. ५८९/२०१७ भादंवि कलम ३८५, ३८७ मधील फिर्यादी डॉ. महाजन यांना काही दिवसांपुर्वी १० लाख खंडणी देणेबाबत फोन आला होता "नाहितर तुझा भाचा तुझी मुले कोणत्या शाळेत जातात ते आम्हाला माहिती आहे, त्यांना खल्लास करु" अशी धमकी दिली होती.

त्यानंतर दि. २६/०५/२०१८ रोजी पुन्हा डॉ. महाजन यांचे मोबाईलवर फोन येऊन "मी भाई बोलतोय, पैशाची तयारी झाली काय? पोलीसांकडे गेला तर तुला खलास करुन टाकीन" त्यानंतर मागील दोन दिवस ०२ ते ०३ वेळा डॉ. महाजन यांना फोन करुन आज दि. ०४/०६/२०१८ रोजी पैसे तयार ठेवणेबाबत धमकीचे फोन आले होते. डॉक्टरांनी पैशाची तयारी दाखविल्यांनतर आज रोजी डॉक्टरांना पुन्हा फोन करुन दुपारी ०१:०० वाजणेच्या दरम्यान उंड्री चौकात पैसे घेऊन येण्यास सांगितल्याने भारती विद्यापीठ पोलीस ठाणे व खंडणी विरोधी पथक, पुणे शहर यांनी संयुक्तरित्या तयारी करुन डॉक्टरकडे १० लाख रुपये देऊन उंड्री चौकात ट्रॅप लावला. त्यानंतर आरोपींनी पुन्हा डॉक्टरांना मंतरवाडी फाट्यावर येण्यास सांगितले. त्यावेळी दोन मोटार सायकलवरुन तीन संशयित इसम रस्त्याने जात असताना दिसले. त्यापैकी एका मोटार सायकलला नंबर प्लेट नव्हती. तसेच त्यावरील दोघांनी तोंडाला रुमाल बांधलेला होते. त्यांचे मोबाईलवर बोलणे व हालचाली संशयास्पद वाटल्याने हांडेवाडी चौकात त्यांच्या गाड्या आडवुन त्यांना ताब्यात घेतले असता, त्याचे नाव व पत्ता विचारले असता, १) आकाश संतोष पवार, वय-२४ वर्षे, रा. डाळींबरोड, पांढरस्थळ वस्ती, कॅनॉलजवळ, ऊरळीकांचन, पुणे २) शकिल कल्लुखान पठाण, वय-२९ वर्षे रा. सदर, ३) अक्षय शिवाजीराव रावडे, वय-२४ वर्षे, रा. सदर असे सांगितले. त्यांचेकडे ०२ डयुप्लीकेट पिस्टल, ०१ फायटर, ०४ मोबाईल त्यापैकी एकाकडे डॉ. महाजन यांना फोन केलेला मोबाईल व सिम कार्ड मिळुन आले. आरोपींकडे अधिक माहिती घेता, त्यापैकी एक आरोपीची मैत्रिण व डॉक्टरचा भाचा एकाच कॉलेजमध्ये शिक्षण घेत असुन त्यातुन त्यांची ओळख झाली होती. त्यातुन आरोपिंनी डॉक्टरची माहिती मिळवुन डॉक्टरकडे भरपुर पैसे आहेत असे समजुन त्यांनी खंडणी मागितली होती.

सदर कामगिरी परिमंडळ २ पुणे चे पोलीस उपायुक्त डॉ. श्री प्रवीण मुंढे साो, सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक कमलाकर ताकवले, तसेच सपोनि चंद्रकांत सुर्यवंशी, तपास पथकाचे पोउनि शिवदास गायकवाड, भोलेनाथ अहिवळे, खंडणी विरोध पथकाचे सपोनि शेलार, तसेच भारती विद्यापीठ पोलीस ठाणेचे तपास पथक व खंडणी विरोध पथकाचे कर्मचारी एकुण ०५ अधिकारी व २६ कर्मचारी अशी संयुक्तीकरित्या कामगिरी करण्यात आली आहे.

(कमलाकर ताकवले)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
भारती विद्यापीठ पोलीस ठाणे, पुणे शहर


पुणे शहर पोलीस